दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज


संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४, अंक : १३५**
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२७ डिसेंबर २०२४


"सुरवात करायची असेल तर आजपासूनच करा, उद्यापासून करू असं म्हंटल तर तो उद्या कधीच येत नाही".

## माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं निधन !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, दिल्ली :** देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झालं आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे (२६ डिसेंबर) त्यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्यत मालवली. त्यांच्या निधनामुळे अवघ्या देशावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त एम्स रुग्णालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

मनमोहन सिंग यांना रात्री ८ वाजता आपत्कालीन परिस्थिती दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरू असताना रात्री ९.५१ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.

मनमोहन सिंग ३३ वर्षे खासदार होते. विद्वान, मृदू, मितभाषी आणि संवेदनशील नेता म्हणून मनमोहन सिंग यांच्याकडे पाहिले जायचे. जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यानंतर ते पहिलेच असे पंतप्रधान होते, जे १० वर्षे देशाचा राज्यकारभार सांभाळू शकले. २००४ ते २०१४ असे दहा वर्ष ते देशाचे पंतप्रधान होते. तसेच १९९८ ते २००४ या काळात ते राज्यसभेचे विरोधी पक्षनेतेही होते.

३३ वर्षांपूर्वी म्हणजे १९९१ साली डॉ. मनमोहन सिंग यांनी राज्यसभेच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. चार महिन्यातच त्यांनी माजी पंतप्रधान पीव्ही नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री म्हणून शपथ घेतली.

भारताने आपले सर्वात प्रतिष्ठित नेते डॉ. मनमोहन सिंग यांना गमावलं आहे. नम्रपणा जोपसाणारे मनमोहन सिंग सन्माननीय अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी विविध सरकारी पदांवर तसेच अर्थमंत्री म्हणून काम केले आणि गेल्या काही वर्षांत आमच्या आर्थिक धोरणावर मजबूत ठसा उमटवला. संसदेतील त्यांचा हस्तक्षेपही अभ्यासपूर्ण होता. आपले पंतप्रधान या नात्याने त्यांनी लोकांचे जीवन सुधारण्यासाठी व्यापक प्रयत्न केले, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

राजकारणात फार कमी लोकांनी सरदार मनमोहन सिंग यांच्याप्रमाणे आदर मिळतो. त्यांचा प्रामाणिकपणा आमच्यासाठी नेहमीच प्रेरणादायी असेल आणि या देशावर खरोखर प्रेम करणाऱ्यांमध्ये ते कायम उभे राहतील. विरोधकांच्या अन्यायकारक आणि गंभीर वैयक्तिक हल्ल्यांना बळी पडूनही राष्ट्रसेवेच्या आपल्या वचनबद्धतेत ते स्थिर राहिले. ते खऱ्या अर्थाने समतावादी, हुशार, प्रबळ इच्छाशक्ती आणि शेवटपर्यंत धैर्यवान होते. राजकारणाच्या खडबडीत जगातला एक अनोखा प्रतिष्ठित आणि सभ्य माणूस असे मनमोहन सिंग होते.

देशाचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांच्या निधनाची बातमी अतीव दु:खदायक आहे. आधी केंद्रीय वित्तमंत्री आणि नंतर पंतप्रधान असताना देशाच्या आर्थिक विकासाला वेग देणारी दमदार पाऊले उचलून देशाच्या अर्थव्यवस्थेचे नवे दालन खुले करणारा क्रांतिकारक निर्णय घेणारा द्रष्टा नेता अशी त्यांची ओळख इतिहासात कायम राहील. अत्यंत साध्या, सरळ आणि शांत स्वभावाचे डॉ.मनमोहन सिंह हे एक नामवंत अर्थतज्ञ म्हणून जागतिक स्तरावर ओळखले जात होते. त्यांच्या निधनाने एक धोरणी आणि हुशार असे अर्थतज्ज्ञ, राजकीय नेतृत्व हरपले आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती मिळो, तसेच त्यांच्या कुटुंबीयांना या दु:खातून सावरण्याकरता बळ मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक करा



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.२६, किनवट (नांदेड) :** मस्साजोग तालुका केज जिल्हा बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यासह मुख्य सूत्रधाराच्या शोध घेऊन तात्काळ अटक करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने सहाय्यक जिल्हा अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दंडाधिकारी किनवट यांच्यामार्फत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले.१ डिसेंबर २०२४ रोजी मसाजोग तालुका केज जिल्हा बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून क्रूर व निर्दयी पणे हत्या करणाऱ्या सर्व आरोपीस तात्काळ अटक करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी उपविभागीय अधिकारी किनवट यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना करण्यात आली. या निवेदनावर सुरेश सोळंके पाटील, सचिन कदम पाटील, आकाश इंगोले, अजय कदम पाटील, संतोष डोंनगे, विक्रम पवार, वैभव हजबे, बबन वानखेडे, बाळासाहेब यादव, दत्ता नरवाडे, बालाजी आंकडे, नंदकिशोर जामगे, उमाकांत कराळे, सुमित माने, शिवा पवार, संदीप कदम, कृष्णा वरुडे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## अवघी दुमदुमली संतनगरी !
## विदर्भ पंढरीत पाऊण लाख भाविकांची मंदियाळी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, बुलडाणा :** नाताळ निमित्त असलेल्या सुट्ट्यांमुळे सध्या राज्यातील पर्यटन केंद्रे, धार्मिक स्थळे पर्यटक आणि भाविकांनी गजबजली आहेत. याला विदर्भ पंढरी म्हणून विख्यात शेगाव नगरी देखील अपवाद नाही.

आज २६ डिसेंबर रोजी सकाळपासून दिवसभर संतनगरी शेगावमध्ये हेच दृश्य पाहवयास मिळाले. मार्गशिष् महिन्याचा चौथा गुरुवार आणि एकादशी असा दुग्ध शर्करा योग जुळून आला. यामुळे संतनगरीत कमीअधिक पाऊण लाख भाविकांची मांदियाळी जमल्याचे दिसून आले. यामुळे संत गजानन महाराज संस्थान मंदिर परिसर ते मंदिराकडे येणारे मार्ग आबालवृद्ध भाविकांनी नुसते फुलून गेल्याचे चित्र होते. विदर्भासह राज्यातील हजारो भाविक, बुधवारपासूनच शेगाव नगरीत डेरे दाखल झाले होते. तसेच नजीकच्या जिल्ह्यातील पायी दिंड्याचे देखील आगमन झाले. त्यांच्या निवासाची संस्थानमार्फत सुसज्ज व्यवस्था करण्यात आली.

**दर्शनासाठी तीन तास !**

'श्रीं' च्या समाधी स्थळी नतमस्तक होण्यासाठी भाविकांच्या आज गुरुवारी पहाटेपासूनच रांगा लागल्याचे दिसून आले. उत्तरोत्तर दर्शन बारीतील गर्दी वाढतच गेली. आज मध्यान्ही या गर्दीने कळस गाठला. प्रत्यक्ष दर्शनासाठी तीन तास लागत होते. मुख दर्शनासाठी वीस मिनिटे ते अर्धा तास लागत होते. दुसरीकडे संस्थानकडून मोफत वितरित करण्यात येणाऱ्या महाप्रसादासाठी भाविकांच्या दीर्घ रांगा लागल्या.

शेगाव येथे येणाऱ्या सर्व रेल्वेगाड्या एसटी बसेसमधून मोठ्या प्रमाणात भाविक बाहेर पडताना दिसत होते. यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले. श्री संस्थानकडून भाविकांसाठी आज पहाटे ४ वाजतापासून श्रींचे मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे. भाविकांसाठी एकेरी मार्ग करण्यात आला असून मंदिरामध्ये सकाळी १० ते ५ पर्यंत महाप्रसाद, श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, श्रींची गादी तसेच औदुंबर दर्शनाची व्यवस्था केली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवासाची नियमानुसार राहण्याची व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू आहे. संपूर्ण मंदिर परिसरात स्वच्छता ही भक्तांना श्रींच्या प्रति आपली आस्था प्रसन्न मनाने एकरूप करणारी आहे. भक्तांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर असल्याचे दिसून आले.

**३१ ला रात्रभर खुले !**

संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्ष स्वागतानिमित्त श्रींच्या दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन समाधी मंदिर ३१ डिसेंबर २०२४ रोजी दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे. संस्थानच्या वतीने ही माहिती देण्यात आली आहे.

## औद्योगिक वसाहतीमधील कर्मचाऱ्यांच्या क्षयरोग चाचण्या करणार



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, पनवेल :** क्षयरोग मुक्त भारत करण्याच्या उद्देशाने १०० दिवसीय क्षयरोग मोहिम पनवेल महानगर पालिका कार्यक्षेत्रात राबविली जात आहे. या मोहिमेंतर्गत पनवेल, जवाहर, तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कर्मचाऱ्यांचे क्षयरोग चाचण्या करून घेण्याबाबत आज (दि.२६) रोजी मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

यावेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, जेसीआयइएल चे व्यवस्थापक आर.एस. निकम, अध्यक्ष बी.पी. तेरडे, तळोजा इंडस्ट्रीयल असोशिएशनचे पदाधिकारी सुनिल पडीयशी, पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटचे व्यवस्थापक दत्तकुमार सावंत, तळोजा इंडस्ट्रीयल असोशिएशनचे सतिश शेट्टी, बिनीत सालियन, प्रिती शेट्टी, पनवेल इंडस्ट्रीयल इस्टेटचे कृष्णा पाटील उपस्थित होते. क्षयरोगाचे जास्तीत जास्त नवीन रूग्णांना त्वरीत उपचाराखाली आणणे, क्षयरुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, क्षयरोग सहवासितांना क्षयरोग प्रतिबंधक औषधोपचार देणे तसेच मोठ्या प्रमाणावर क्षयरोगाबाबत जनजागृती करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

या उद्देशाने आजच्या बैठकीमध्ये पनवेल, जवाहर, तळोजा औद्योगिक वसाहती मधील कर्मचाऱ्यांचे क्षयरोग चाचण्या करून घेण्याबाबत, तसेच संदर्भित रुग्णांचे एक्सरे व क्षयरोग चाचणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात दि.७ डिसेंबर पासून या मोहिमेस सुरुवात झाली आहे. ह्या मोहीमेंतर्गत संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. या सर्वेक्षणातून अतिजोखमीची संख्या एकत्रित करण्यात येत आहे. या १०० दिवसात जोखीमग्रस्त भागांतील संशयितांची तपासणी करून त्यांना प्रतिबंधक औषधोपचार करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

## कल्याणमधील अल्पवयीन मुलीवर अत्याचार व हत्येप्रकरणी मुख्य आरोपीला अटक



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२६, कल्याण (ठाणे) :** कल्याणमधील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करुन तिची हत्या केल्याप्रकरणी मुख्य आरोपीला अटक केली आहे. शेगाव येथून पोलीस पथकाने आरोपीला ताब्यात घेतलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल गवळी पत्नीच्या गावी लपून बसला होता. पत्नीच्या गावातून शेगाव येथून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी विशाल गवळीला अखेर पोलिसांनी पकडलं आहे. कल्याण पोलिसांची सहा पथकं त्याच्या मागावर होती. शेगाव येथून पोलीस पथकाने त्याला ताब्यात घेतलं. विशाल गवळी पत्नीच्या गावी लपून बसला होता. अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणाने संपूर्ण कल्याणला हादरवून सोडलं आहे. नागरिकांच्या मनात या घटनेवरुन प्रचंड रोष आहे.

सोमवारी संध्याकाळी कल्याण कोळसेवाडी परिसरातून एक अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली होती. तिचा मृतदेह काल दुपारी कल्याण भिवंडी मार्गावरील बापगाव परिसरात एका कब्रस्तानमध्ये सापडला. कल्याणमध्ये एका अल्पवयीन मुलीचं अपहरण करण्यात आलं. त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी विशाल गवळी, त्याची पत्नी साक्षी गवळी आणि रिक्षाचालकाला अटक केली. रिक्षा चालकाला कालच अटक केली होती. तर साक्षीची काल राहत्या घरातून अटक करण्यात आली होती आणि विशालच्या आज बुलढाण्यातून मुसक्या आवळण्यात आल्या. साक्षीला आज कोर्टात हजर करण्यात आलं होतं. तिला कोर्टाने दोन दिवसांची कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर साक्षीने या गुन्ह्याची कबुली दिली आहे. तिने या गुन्ह्याचा संपूर्ण घटनाक्रमच पोलिसांना सांगितला.

विशाल गवळी हा संध्याकाळी ५ वाजता मुलीला घरी घेऊन आला होता. त्यानंतर त्याने तिच्याशी गैरकृत्य केलं आणि नंतर तिची हत्या केली. तिची हत्या केल्यानंतर त्याने एका मोठ्या बॅगेत तिचा छिन्नविछिन्न मृतदेह ठेवला होता. त्यानंतर साक्षी ही संध्याकाळी ७ वाजता घरी आली. साक्षी एका खासगी बँकेत नोकरीला आहे. साक्षी घरी आली तेव्हा विशालने झालेला प्रकार तिला सांगितला. हा प्रकार ऐकून ती हैराण झाली होती, असं साक्षीने म्हटल्याचं समजते. त्यानंतर दोघा नवरा बायकोने एकत्र बसून मृतदेहाचे काय करायचे याचा विचार केला. त्यानंतर दोघांनी मृतदेहाची विल्हेवाट लावण्याची योजना आखली. त्याआधी दोघांनी घरातील संपूर्ण रक्त पुसून काढले. रात्री ८:३० वाजता विशालने मित्राची रिक्षा बोलावून घेतली. ९ वाजता ते रिक्षात मृतदेह टाकून बापगावच्या दिशेने रवाना झाले. त्यानंतर त्यांनी बापगावला अज्ञातस्थळी मृतदेह फेकला आणि तिथून पलायन केलं.

बापगाववरून परत येत असताना विशालने आधारवाडी चौकातून दारू विकत घेतली. त्यानंतर तिथून तो बुलढाण्याला निघून गेला. साक्षी कल्याणमध्येच राहिली. इथपर्यंत सर्व ठिक होतं. पण जेव्हा विशालवर संशय आला तेव्हा पोलिसांनी कसून तपास केला. त्यावेळी विशालच्या घराजवळ पोलिसांना रक्ताचे डाग सापडले. त्यामुळे पोलिसांना हे कृत्य विशालनेच केल्याचं दिसून आलं. त्यानंतर पोलिसांनी साक्षीला ताब्यात घेतलं आणि तिची कसून चौकशी केली. तेव्हा तिने या खूनाची सर्व माहिती पोलिसांना दिली.

## गोदावरी नदीत पडुन युवकाचा मृत्यू

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२६, मुदखेड (नांदेड) :**

मुदखेड तालुका व लोहा तालुका या दोन्ही तालुक्यांमध्ये गोदावरी नदी आहे. या नदीमध्ये दि.२३ रोजी दुपारी अंदाजे दिडच्या दरम्यान युवकाने उडी घेतली होती.


गेल्या ४ दिवसांपासून नदीमध्ये बरबडा तालुका नायगाव येथील तरुण सिताराम साईनाथ शेटे वय २५ याने उडी घेतली होती. त्या अनुषंगाने मुदखेड पोलीस ठाणे व उस्मान नगर पोलीस ठाण्याच्या संयुक्त विद्यमाने शोध सुरू होता. शेवटी आज दि.२६ डिसेंबर रोजी नदीत मासे पकडण्याचे गळ, लंगर व जेसीबीच्या साहाय्याने प्रेत बाहेर काढण्यात आले. उस्मानगर पोलिसांनी प्रेत ताब्यात घेऊन प्रेत शवविच्छेदनासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात पाठविले आहे.

४ दिवसांपासून मूदखेड पोलीस ठाण्याचे पोहेका गंगाधर शिंदे, पोहेका मधुकर पवार हे तपास करीत होते. तर उस्मानगर ठाण्याचे पोहेका अशोक हंबर्डे हेही तपास करीत होते. पुढील तपास उस्मान नगर ठाण्याचे पोहेका अशोक हंबर्डे हे करीत आहेत.

# थोडक्यात

## दिव्यातील पाणी खात्याच्या अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची तात्काळ बदली करा
## मनसेची महापालिका आयुक्तांकडे मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**




**दि.२६, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील पाणी प्रश्नावर आमरण उपोषण करत असलेल्या विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत आज मनसे पदाधिकाऱ्यांनी ठाणे महानगर पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेतली. दिवा शहरातील पाणी खात्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे टँकर माफिया आणि पाणी विकणाऱ्यांसोबत साटलोटं असल्याने त्यांची तात्काळ बदली करावी अशी मागणी आज मनसे कडून करण्यात आली. यावेळी दिवा शहरातील अनधिकृत बांधकामे तातडीने थांबवून त्यांना बांधकामासाठी होणारा पाणी पुरवठा तात्काळ थांबवावा, टँकर माफिया आणि पाणी माफियांकडून होणारी पाणी चोरी थांबवून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. ज्या ठिकाणीं अधिकृत कनेक्शन असूनही पाणी येत नाही. त्यांची पाण्याची बीलं माफ करण्यात यावीत, दिव्यातील सर्व पाण्याच्या जोडण्याना पाण्याचे मीटर बसविण्यात यावेत. दिवा परिसरातील आरक्षित जमिनींवर होणारे अतिक्रमण थांबवून त्या जागांवर पाण्याचे जलकुंभ उभारावेत अशा मागण्या शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी महापालिका आयुक्तांकडे केल्या आहेत. यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश भोइर, शहर सचिव प्रशांत गावडे, विभाग अध्यक्ष शरद पाटील हे उपस्थित होते.

## सेंट टेरेसा शालेय क्रीडा महोत्सवाचा सांगता समारोह संपन्न

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२६, बांद्रा (मुं.उपनगर) :** सेंट टेरेसा बॉईज हायस्कूल वांद्रे शाळेच्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. नुकताच या महोत्सवाची सांगता समारोह पार पडला. यावेळी शाळेतील प्रमुख मान्यवर मुख्याध्यापक फादर निकी, पॅरिस धर्मगुरू फादर हेन्री, उपमुख्याध्यापिका रोझ लोबो, पर्यवेक्षक फिलिप रॉड्रिग्ज, ॲडमिनीस्त्रेटिव फादर शिनोय आणि मार्च पास्ट चे जज प्रदीप लोबो, चेतन पगारे आदींच्या उपस्थितीत सांगता समारोह पार पडला. शाळेची शिखर संस्था असलेल्या एस.वी.डी हिला १५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल साठेचे संस्थापक संत अरनॉल्ड जानसन यांना उपस्थितांचे वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी १००, २०० आणि ४०० वैयक्तिक धावणे, १००÷४ रीले, थ्री लेग रेस, गोणपाट शर्यत, रस्सीखेच (टग ऑफ वॉर) पार पडल्या.यात प्रामुख्याने ब्ल्यू हाऊस ६५ गुणांसह विजेता ठरला. विजेत्यांना शाळेतील पंचवीस आणि त्याहून अधिक सर्व्हिस केलेल्या शिक्षिका लिंडा, गणेश, टीचर उज्वला, टीचर मारिया व्होरा, टीचर सीमा आणि उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. ही शाळा १९५२ रोजी सुरू झाली असून आतापर्यंत अनेक सेलिब्रिटी आणि उत्तम खेळाडू ज्यांनी राज्य आणि राष्ट्र स्तरावर शाळेचे नाव उज्वल केलेले आहे. यावेळी अनेक माजी विद्यार्थी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेतील क्रीडा शिक्षिका संजीवनी गजरे आणि क्रीडा शिक्षक अक्षय जाधव, मेलकन यांनी स्पोर्ट्स कमिटीच्या वतीने अत्यंत दिमाखदार सोहळा संपन्न केला. अक्षय जाधव यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे त्यांचा जॉय ऑफ गिवींग संस्थेच्या वतीने खास सत्कार उपस्थित पाहुण्यांनी सन्मानचिन्ह देऊन केला.

## डॉ.रामदास आठवल्यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगासाठी शाल व ब्लँकेट वाटप



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.२८, तुर्भे (नवी मुंबई) :** पोटात तुझ्या पेटली आग उठ दलिता तोफा डाग अशी हाक देऊन महाराष्ट्रातील सर्व युवकांना पँथर बनवणारी संघटना म्हणजे भारतीय दलीत पँथर. त्याच संघटनेचा एक पँथर म्हणजे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ.रामदास आठवले यांच्या वाढदिसा दिवशी रिपब्लिकन परिवारातील सर्व कार्यकर्ते संघर्षदिन म्हणून साजरा करतात. आठवले यांच्या कार्यकर्त्यांसाठी जणू ही एक प्रकारची पर्वणीच पुन्हा एकदा लोकांमध्ये त्यांच्या सेवेसाठी जाण्याकरिता. त्याचे औचित्य साधून रीपाई शाखा तुर्भे स्टोअरचे शाखाध्यक्ष अभिमान जगताप यांच्या आयोजन व नियोजनातून डॉ.रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त तुर्भे स्टोअर वसाहतीत ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग नागरिकांसाठी मायेची शाल, ब्लँकेट, वाटण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या स्तुत्य उपक्रम यासाठी सिद्राम ओहोळ (महा.प्रदेश उपाध्यक्ष तथा नवी मुंबई निरीक्षक), नागेशजी कांबळे (वरिष्ठ उपाध्यक्ष, नवी मुंबई जिल्हा), यशपाल ओहोळ (युवक अध्यक्ष, नवी मुंबई जिल्हा), नितीन कांबळे (युवक उपाध्यक्ष, नवीमुंबई जिल्हा), कु.अंजलीताई अभिमान जगताप (युवती अध्यक्षा, नवी मुंबई जिल्हा) यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. सदर कार्यक्रम चालू असताना अज्ञात लोकांनी जाणून बुजून वीज खंडित करण्यात आली. त्यामुळे काही क्षणाकरीता कार्यक्रमात व्यत्यय निर्माण करण्यात आला. पण आम्ही ही भीमाची लेकरे आहोत. अंधाराला न डगमगता उपस्थित जनसमुदायाने आपापल्या मोबाईल टॉर्चद्वारे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यास हातभार लावला. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात विशाल कांबळे युवाप्रतिष्ठान, सायली फाउंडेशन आणि शांतीदूत प्रतिष्ठान व पक्षाचे कार्यकर्ते या सर्वांची मोलाची साथ लाभली. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# थर्टी फर्स्टला पहाटेपर्यंत मिळणार दारू उत्पादन शुल्कचे आदेश
## जिल्ह्यात दणक्यात होणार सेलिब्रेशन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** नवीन वर्षाची सुरूवात होण्यासाठी अवघे काही दिवस उरले आहेत. यामुळे सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाच्या स्वागतासाठी अनेकजण मोठ्या उत्साहाने तयारी करत आहे.

या दिवशी दारू पिणार्यांची संख्या अधिक असते. अशा मद्यप्रेमींना आता खुशखबर दिली आहे. थर्टी फर्स्ट निमित्त दारूची दुकाने रात्री एक वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. तर पब आणि बार यांना पहाटे ५ वाजेपर्यंत मद्यविक्री करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या आदेशानंतर येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाने आदेश काढले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात थर्टी फर्स्टचे सेलिब्रेशन दणक्यात होणार आहे. अनेकजण दारू पिऊन सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचे स्वागत करतात. या काळात दारूची सर्वाधिक विक्री होते. थर्टी फर्स्टच्या दिवशी दारू पहाटेपर्यंत उपलब्ध होणार आहे. बीअर/वाईन विक्री करणार्या दुकानांना १ वाजेपर्यंत विक्रीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. गृह विभागाच्या आदेशानुसार दारू दुकानांची वेळ दिनांक ३१ डिसेंबरच्या दिवशी वाढवण्यात आली आहे. रात्री १ वाजेपर्यंत दारूची दुकाने सुरू राहणार आहेत. मात्र, पब आणि बारला पहाटे ५ वाजेपर्यंत मद्यविक्रीला परवानगी देण्यात आली आहे. सरकारी परवानगीनुसार दारू दुकाने सुरू करण्याबाबत परिपत्रक जारी केले आहे.



**गैरप्रकारांवर पोलिसांची नजर** थर्टी फर्स्टच्या दिवशी सर्वजण सेलिब्रेशन करतात. पण या काळात बंदोबस्ताला असणाऱ्या पोलिसांची दमछाक होते. राज्य सरकारने दारूची दुकाने सुरू ठेवण्याचा वेळ वाढविल्याने पोलिसांची कसरत होणार आहे. ३१ डिसेंबर २०२४ रोजी गैरप्रकार टाळण्यासाठी पोलिस चोख बंदोबस्त ठेवणार आहे. तसेच अवैध दारू विक्रीवर चाप बसवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाची आठ पथके तैनात राहणार आहे. रात्रीच्या गस्त, अनधिकृत ढाबे, फार्म हाऊस तसेच संशयित वाहनांची तपासणी पोलिसांकडून केली जाणार आहे.

दरम्यान, थर्टी फर्स्टच्या दिवशी रिर्साट, हॉटेल आदी ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या पार्ट्यांना एक दिवशीय परवाना घेणे बंधनकारक आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून हा परवाना दिला जातो. अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील विविध ठिकाणी हॉटेल्स, लॉन तसेच फार्म हाउस अशा ठिकाणी पार्ट्यांचे नियोजन केले जाते.

अशा पार्ट्यांत मोठ्या प्रमाणात दारूचा वापर केला जातो. परंतु ती दारू बनावट दारू असण्याची शक्यता नाकारता येत नाही. बनावट दारूची विक्री होणार नाही.

याकडे लक्ष देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक प्रमोद सोनोने, उपअधीक्षक प्रविण कुमार तेली यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईसाठी ८ पथके स्थापन केली आहेत.

# धाराशिवकरांच्या आंदोलनाला मोठे यश
## पोदार स्कूल ते जुना उपळारोडपर्यंत सर्विस रोडचे काम मुदतीत पूर्ण

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२६, धाराशिव :** एनएचएआय आणि आयआरबी कंपनीच्या निष्काळजीपणामुळे रखडलेल्या सर्विस रोडचे काम एका विद्यार्थ्याचा अपघातात बळी गेल्यानंतर नागरिकांनी रस्त्यावर उतरून केलेल्या रास्तारोको आंदोलनामुळे अखेर पूर्ण झाले आहे.

धाराशिवकरांच्या आंदोलनाला मोठे यश आले असून पोदार स्कूल, डी-मार्टमध्ये खरेदीसाठी जाणारे ग्राहक आणि इतर नागरिकांची या सर्विस रोडमुळे सोय झाली आहे. त्याचबरोबर महामार्गालगत रेल्वे स्टेशन ते तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज पर्यंत दोन्ही बाजूच्या सर्विस रोडचे काम देखील तातडीने पूर्ण करावे. अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पोदार इंग्लिश स्कूलमधील अर्णव अजय सोनवणे या विद्यार्थ्याचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर धाराशिवकरांच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ.मैनाक घोष यांना निवेदन देऊन रास्तारोको आंदोलनाचा इशारा दिला होता.

दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी धाराशिवकर नागरिक, विद्यार्थ्यांचे पालक तसेच विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरुन डी-मार्टसमोर तब्बल दीड तास रास्तारोको आंदोलन केले. सर्विस रोड १५ दिवसाच्या आत करून द्यावा. त्याशिवाय रास्ता रोको आंदोलन मागे घेणार नाही असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला. त्यामुळे जमिनीवर पाय आलेल्या एनएचएआय आणि आयआरबी कंपनीच्या प्रतिनिधींनी आंदोलकांची भेट घेऊन दिनांक २५ डिसेंबरपर्यंत पोदार स्कूल ते जुना उपळा रोडपर्यंत सर्विस रोडचे काम पूर्ण करुन देण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. एनएचएआय आणि आयआरबी कंपनीच्या वतीने देण्यात आलेल्या आश्वासनानुसार २१ डिसेंबरपर्यंत सर्विस रोडचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे पोदार स्कूल, डीमार्ट आणि जुना उपळा रोड या भागातील अपघाताचे प्रमाण कमी होणार आहे.



**नागरिकांनी सर्विस रोडचा वापर करावा**

नागरिकांनी सर्विस रोडचा वापर करावा. राष्ट्रीय महामार्गावर विरुद्ध दिशेने प्रवास करू नये. सध्या पोदार स्कूल, डी-मार्ट आणि जुना उपळा रोड भागात सर्विस रोडचे काम पूर्ण झाले असले तरी एवढ्यावरच हे आंदोलन थांबणार नाही. रेल्वे स्टेशन ते तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज पर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूचा सर्विस रोड २८ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण करून आवश्यक ठिकाणी गतिरोधक व पथदिवे तसेच विकास नगर येथील अंडरपासचे काम कामे पूर्ण करावे आणि जुना उपळा रोड येथील अंडरपाससाठी संबंधित विभागाकडे रितसर प्रस्ताव पाठवावा.

**सोमनाथ गुरव (शहर प्रमुख, शिवसेना)**

# घोड्यांमुळे माथेरानच्या पर्यावरणाचा होणारा ऱ्हास याचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पर्यावरण संस्था करणार अभ्यास

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२६, माथेरान :** सामाजिक कार्यकर्ते सुनिल शिंदे व ई रिक्षा चालक केतन रामाणे यांनी हरित लवाद , पुणे बेंच येथे दाखल केलेल्या याचिकेवर दिनांक २३ डिसेंबर रोजी सूनवाई झाली. घोड्यांमुळे माथेरानच्या पर्यावरणाचा होणार ऱ्हास थांबवण्यासाठी विविध उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक २५ ऑक्टोबर रोजी हरित लवादाने ३ सदस्यीय समिती स्थापन केली होती. या संयुक्त कामिटीमध्ये पर्यावरण खात्याचे डॉव थिरूनवुकरसु (शास्त्रज्ञ श्रेणी ई), राहुल इंगळे मुख्याधिकारी माथेरान नगरपालिका व ऋतुजा भालेराव विभागीय अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड यांनी नोव्हेंबर महिन्यात माथेरानच्या विविध भागाची पाहणी केल्यानंतर घोड्यांच्या परिणामांचे गांभिर्य पाहता पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी



पर्यावरणातील तज्ञ संस्थेची नेमणूक करण्याचा निर्णय घेतला. संयुक्त समितीने ५ संस्था सोबत चर्चा केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञ संस्था माणगाव रायगड, फर्ग्युसन महाविद्यालय पुणे, वीर जिजामाता संस्था मुंबई, सावित्रीबाई फुले पुणे व भारती विद्यापीठ पुणे यांच्या सोबत सविस्तर चर्चा केल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर या संस्थेचा अनुभव पाहता त्यांच्याकडे जबाबदरी देण्याचा निर्णय संयुक्त समितीने घेतला. या अभ्यासासाठी हरित लवादाने ३ महिन्यांची मुदत दिल्याने पुढील सूनवाई दिनांक १५ एप्रिल रोजी ठेवली आहे. तत्पूर्वी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मा सर्वोच्च न्यायालयाने माथेरानचे पर्यावरण अबाधित रहावे. यासाठी फेब्रुवारी २००३ मध्ये माथेरानला पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित केले आहे. माथेरानचा एकूण परिसर ७.२ स्क्वेर किमी इतका आहे ७० टक्के परिसर वनराईने व्यापला आहे. घोडा झाडाच्या संपर्कात आल्याने अनेक झाडे मेली आहेत. त्यामुळे पर्यावरणाची विपरीत हानी होते. पर्यावरण खात्यातर्फे ॲड.शुभम राठोड व राहुल गर्ग तर प्रदूषण नियंत्रण बोर्डा तर्फे ॲड.मानसी जोशी व पूजा नातू तसेच याचिकाकर्ते यांच्या कडून ॲड.तुषार कुमार यांनी युक्तिवाद केला.

# हातलादेवी मंदिर परिसरात बांधलेल्या कठड्याची नासधूस करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२६, धाराशिव :** धाराशिव शहराच्या पश्चिमेस असलेल्या हातलादेवी मंदिर परिसरात नागरिकांना बसण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कठड्यांची अज्ञात समाजकंटकांनी तोडफोड करुन नासधूस केली आहे. त्यामुळे मंदिर परिसराचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण झाले असून भाविकांसह धाराशिवकरांमधून तीव्र असंतोष व्यक्त होत आहे.




बुधवार, दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी येथे मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांना हा प्रकार निदर्शनास आला आहे. याबाबत धाराशिव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात समाजकंटकाविरोधात तक्रार देण्यात आली आहे.

हातलादेवी मंदिराच्या डोंगरावर भाविकांसह पर्यटक देखील मोठ्या संख्येने दररोज येतात. स्थानिकांच्या पुढाकारातून नागरिकांना बसण्यासाठी हातलादेवी मंदिर परिसरात ठिकठिकाणी कठडे बांधण्यात आलेले आहेत. परंतु अज्ञात समाजकंटकांनी या कठड्यांची तोडफोड केली आहे. त्यामुळे भाविकांच्या भावना दुखावल्या आहेत. असे समाजविघातक कृत्य करणार्या समाजकंटकांचा शोध घेऊन तात्काळ अटक करावी. तसेच अशा समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी, जेणेकरुन यापुढे असे कृत्य करण्याचे धाडस कोणी करणार नाही. अशी मागणी सुधीर रामेश्वर पवार यांनी केली आहे. यावेळी पत्रकार आकाश नरोटे, सलीम पठाण, जफर शेख, कुंदन शिंदे उपस्थित होते.

# महिला बचत गटाचा हफ्ता न भरणे गुन्हा का ?

**अक्षराज : मानसी कांबळे**
**दि.२६, खोपोली (रायगड) :**
* व्यवसायात नुकसान होवून कर्जबाजारी होणे गुन्हा ?
* वसुलीसाठी एजंट शिवीगाळ, दमदाटी करू शकतात ?
* बँक मॅनेजर, वसुली अधिकारी, कर्मचारी सर्वश्रुत का?
* महिलेला दमदाटी करून इज्जत काढू शकतात का?
* महिलांना कायदेशीर कारवाईची धमकी दिली जाते ?



महिलांच्या विकासासाठी..
महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने महिलांना बचत गटाच्या माध्यमातून कर्ज देण्याचा निर्णय घेतला आणि देशातील कोट्यवधी महिला व त्यांच्या बचत गटांना कर्ज देण्यात आले. परंतु महिला स्वावलंबी बनविता बनविता त्यांची इज्जत काढण्याचा परवाना बँक मॅनेजर, बचत गटांवर नेमण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी तसेच कर्ज व हप्ता वसुली अधिकारी यांना मिळत असल्याचे दिसून येत आहे. बचत गटाचा हफ्ता भरला नाही म्हणून एखाद्या म हिलेला दमदाटी, शिवीगाळ करून गल्लीत अथवा बचत गटाच्या मिटींगमध्ये अपमानित करणे...हप्ता भरला नाही म्हणून सर्व महिलांना नोटीस पाठवू...त्यांना यापुढे कोणतेच कर्ज मिळू देणार नाही, अशी धमकी बचत गटांवर नियंत्रण ठेवणारे व कर्ज, हप्ता वसुली अधिकारी देत असल्याचे दिसून येत आहे.
एखाद्या महिलेने व्यवसायासाठी कर्ज घेतले... आणि काही महिने हप्ता भरल्यानंतर सदर महिलेवर कर्ज झाले...व्यवसायात नुकसान होवून महिला व तिचे कुटुंब कर्जबाजारी झाले आणि ते दर महिन्याला महिला बचत गटाचा हप्ता भरू शकत नसेल तर 'त्या' म हिलेकडून पैसे वसुलीसाठी महिला एजंट...बचत गटांवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी व कर्मचारी, बँक मॅनेजर 'त्या' महिलेची गल्लीत अथवा बचत गटाच्या मिटींगमध्ये इज्जत काढू शकतात का? त्या महिलेला उपस्थित बचत गटाच्या महिलासमोर अपमानित करू शकतात का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.
मराठी व हिंदीतील नामांकीत वृत्तपत्र चालविणाऱ्या खोपोलीतील एक महिला व तिचे कुटुंब व्यवसायात नुकसान झाल्याने कर्जबाजारी झाले आहे. नव्याने व्यवसाय सुरू करण्यासाठी...व्यवसाय वाढविण्यासाठी...डोक्यावरील कर्ज फेडण्यासाठी प्रयत्नशील आहेत. डोक्यावर लाखों रुपयांचे कर्ज असल्याने दर महिन्याला महिला व तिच्या कुटुंबाला बचत गट अथवा इतर बँक, मायक्रो फायनान्स कंपनी यांचा ईएमआय, बँकेचा हप्ता भरणे शक्य होत नाहिये... टेन्शनमुळे महिला आजारी पडली आहे. अशा परिस्थितीत बचत गट वसुली महिला एजंट...बचत गटांवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी व कर्मचारी, बँक मॅनेजर 'त्या' महिलेची गल्लीत अथवा बचत गटाच्या मिटींगमध्ये इज्जत काढत असतील तर अशा अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई होणार नाही का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.
दरम्यान, याबाबत बोलतांना अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन (एबीजेएफ) रायगड जिल्हाध्यक्ष पत्रकार राजेंद्र शिवाजी जाधव म्हणाले की, आर्थिक अडचणी किंवा व्यावसायिक नुकसानीमुळे एखादी म हिला व तिचे कुटुंब कर्जबाजारी झाले असेल आणि बचत गटाचा ईएमआय, बँक हफ्ता भरू शकत नसेल आणि तिला महिला एजंट...बचत गटांवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी व कर्मचारी, बँक मॅनेजर दमदाटी, शिवीगाळ करीत असतील किंवा गल्लीत अथवा बचत गटाच्या मिटींगमध्ये अपमानित करीत असतील...ती महिला हफ्ता भरत नाही.
म्हणून गटातील इतर महिलांना वेठीस धरत असतील तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, अर्थमंत्री अजित पवार यांच्यासह केंद्रीय अर्थमंत्री, आरबीआय बँककडे लेखी तक्रार करून अशा अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात येईल. त्याप्रमाणे या उर्मट अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही तर अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन (एबीजेएफ) च्या माध्यमातून कर्जत प्रांताधिकारी यांच्या कार्यालयाबाहेर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन (एबीजेएफ) रायगड जिल्हाध्यक्ष पत्रकार राजेंद्र शिवाजी जाधव यांनी दिला आहे.

# चिपळूणात रंगणार नमन जागर; तब्बल २२ नमन कलाकारांना लोककला गौरव पुरस्कार जाहीर

**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.२५, चिपळूण :** कोकणातील नमन लोककला व लोककलावंत यांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असणारी कोकण कलाक्षेत्रातील अग्रगण्य संस्था अर्थात नमनलोककला संस्था कार्यक्षेत्र (अखंड भारत) ह्या संस्थेचे वतीने लोककला गौरव पुरस्कार २०२४-२५ जाहीर झाले असून निवड झालेल्या कलाकारांना उपरोक्त संस्थेने आयोजित केलेल्या जागर नमन लोककलेचा सन्मान लोक कलावंतांचा -२०२४ -२५ ह्या कार्यक्रमात गौरविण्यात येणार आहे.




**लोककला गौरव पुरस्कार २०२४-२५ प्रति निवड झालेले कलाकार :** गुहागर :- रुपाजी मास्कर (मासू), गोपाळ भेकरे (पाटपन्हाळे) चिपळूण:- धोंडू कळके (वीर), वसंत भोजने संगमेश्वर :- सोमा (अप्पा)फडकले, काशिनाथ गोरुले, लांजा:- जगन्नाथ सुवारे (कुरचुंब) राजापूर:- तुकाराम राऊत, केशव पळसमकर, रत्नागिरी:- चिमाजी गोवळकर (चाफे)
**लोककला प्रेरणा पुरस्कार २०२४-२५ प्रति निवड झालेले कलाकार :**
गुहागर:- संतोष कानसे (चिखली), प्रमोद घुमे (असगोली), संजय साटले ( आरे), चिपळूण:- निलेश साबळे(कोंढे),सखाराम नेवरेकर (मुर्तवडे), संगमेश्वर:- संतोष गुरव (ओझरे-देवरुख), दिनेश साबळे (मुरादपूर-देवरुख), लांजा:- राकेश गुरव (कोचरी), राजापूर:-विजय मांडवकर( पेंडखळे) नरेश लाखण (भू), रत्नागिरी:- सुभाष बांबरकर (धम णसे), प्रवीण कुळये (तरवळ)
**लोककला विशेष पुरस्कार २०२४-२५ :**
श्री पाणबुडी देवी कलामंच (मुंबई), कोकणचा साज संगमेश्वरी बाज लोकनाट्य मंडळ (रत्नागिरी), कु.अन्न्या विजय खेराडे-आबीटगाव-चिपळूण (मी होणार सुपरस्टार, छोटे उस्ताद फेम, स्टार प्रवाह) अशा नमन लोककलावंतांना आणि विविध कलाक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्तींना रविवार दिनांक ०५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० वा. इंदिरा गांधी, सांस्कृतिक केंद्र (चिपळूण ) या ठिकाणी प्रमुख म ान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे.
सदर सोहळ्याला करमणुकीचा कार्यक्रम म्हणून केदारलिंग नाट्य नमन मंडळ, काटवली ता.देवरुख यांचे नमन प्रयोग सादरीकरण होणार असून सदर कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असल्याचे नमन लोककला संस्था (कार्यक्षेत्र भारत) संस्थेचे अध्यक्ष रवींद्र मटकर यांनी अधिक माहिती देताना सांगितले.

# वीरपुत्र फतेह सिंह आणि जोरावर सिंह

सध्याच्या स्पर्धात्मक युगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी शहरासारख्या ठिकाणी बहुतांश हिंदू पालक आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंट शाळांत घालत आहेत. या ठिकाणी शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना ख्रिस्ती पंथाच्या परंपरा, इतिहास यांच्या संदर्भातही माहिती दिली जात असल्याने या हिंदू मुलांच्या घरी ख्रिसमस सुध्दा दिवाळीसारखा साजरा होऊ लागला आहे. पालकांना २५ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान ख्रिस्ती इतिहासात काय काय घडले याची इत्थंभूत माहिती असते; मात्र २१ ते २७ डिसेंबर या दिवसांत भारताच्या इतिहासात काय घडले हे मात्र ठाऊक नसते, केवळ त्यांनाच नाही आपल्यापैकी अनेकांना या दिवसांचा पराक्रमी इतिहास ठाऊक नाही. शीख समाजातील लोक डिसेंबर महिन्यातील या सात दिवसांत कोणतेही शुभकार्य करत नाहीत. त्यांच्यासाठी हा सप्ताह अत्यंत दु:खद आणि वेदनादायी समजला जातो. या सात दिवसांत शिखांचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंह यांचे संपूर्ण कुटुंब धर्माकरीता हुतात्मा झाले.
२१ डिसेंबर १७०४ या दिवशी सिरसा नदीच्या काठावर चम कौर येथे शीख आणि मुघल यांच्यात घनघोर लढाई झाली. हीच लढाई पुढे 'चमकौरची लढाई' नावाने इतिहासात अजरामर झाली. गुरु गोविंद सिंह यांच्या



नेतृत्वाखाली केवळ ४० शिखांनी वजीर खानच्या १० लक्ष मुघल सैनिकांशी जीवाच्या शिकस्तीने लढा दिला. २१ डिसेंबरला श्री गुरु गोविंद सिंह यांनी आपल्या कुटुंबासह श्री आनंदपूर साहिबचा किल्ला सोडला. २२ डिसेंबरला गुरु साहिब आपल्या दोन मोठ्या मुलांसह चमकौरच्या मैदानावर पोहोचले. त्यांच्या घरातील स्वयंपाक्याने गुरू साहिबांची पत्नी आणि दोन लहान मुलांना आपल्या घरी नेले. चमकौरच्या लढाईत शत्रूशी लढताना गुरू साहिब यांचा १७ वर्षीय मोठा मुलगा अजित सिंह आणि १४ वर्षांचा धाकटा मुलगा जुझार सिंह त्यांच्या ११ साथीदारांसह धर्म आणि देश यांच्या रक्षणासाठी हुतात्मे झाले. २३ डिसेंबरला गुरु गोविंद सिंहांची पत्नी आणि दोन्ही लहान मुलांना फितुरीने पकडण्यात आले. २४ डिसेंबरला आई गुजर कौर आणि दोन भावांना सरहिंद येथे नेण्यात आले. २५ डिसेंबरला ६ वर्षाच्या धाकट्या मुलाला म्हणजे फतेह सिंह यांना वजीर खानच्या दरबारात हजर करून त्यांना धर्मांतराचे आमिष दाखवण्यात आले. यावेळी वजीर खान ६ वर्षाच्या कोवळ्या फतेह सिंहांना मग्रुरीने सांगतो, 'इस्लाम धर्म स्वीकारा, नाहीतर मरणाला तयार राहा !' त्यावर फतेह सिंह तेवढ्याच बाणेदारपणे सांगतात, 'इस्लाम स्वीकारला, तर मरण येणार नाही का ? मरण येणारच असेल, तर ते आपल्या धर्मात राहून धर्मासाठी बलिदान करून मरण पत्करू' ६ वर्षे वयात कुठून आला हा धर्मप्रतीचा एव्हढा जाज्वल्य अभिम ान ! फतेह सिंहांच्या या उत्तराने वजीर खानही चक्रावला. धर्मांतरास तयार न झाल्याने २६ डिसेंबरला ८ वर्षीय जोरावर सिंह आणि ६ वर्षांचे फतेह सिंह यांना भिंतीत जिवंत गाडण्यात आले. फतेह सिंहांच्या मानेपर्यंत वीटा बांधण्यात आल्या तेव्हा जोरावर सिंह रडू लागले आणि म्हणाले 'तू माझ्यानंतर जगात आलास; मात्र बलिदानात तू माझ्यापुढे चाललास' ६-८ वर्षांच्या वयात कोणाम ध्ये असते एव्हढे धैर्य आणि एव्हढा त्याग ! ज्या वयात मुलांना पदोपदी आई वडिलांच्या आधाराची गरज भासते त्या वयात या दोघा भावंडांचा धर्माप्रतीचा त्याग, धर्मासाठी हसत हसत बलिदान करण्याची वृत्ती केवळ अवर्णनीय आहे. दोन्ही मुलांच्या बलिदानाचे वृत्त माता गुजर कौर यांच्या कानी पडताच २७ डिसेंबरला त्यांनीही प्राणत्याग केला.
काश्मीर मधील हिंदूंचे धम ांतर थांबावे यासाठी गुरु गोविंद सिंह यांचे पिता गुरु तेगबहादूर सिंह यांनी स्वत:हून बलिदान दिले. रामजन्मभूमीच्या म ुक्तीसाठीही त्यांनी प्रयत्न केले. शिखांच्या सर्वच गुरुंनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी प्रसंगी स्वत:चे प्राण पणाला लावले. गुरु गोविंद सिंहाच्या परिवाराच्या त्यागाचे स्मरण म्हणून केंद्र सरकारने गतवर्षीपासून २६ डिसेंबर 'वीर बाल दिवस' म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले. गुरु गोविंद सिंहांच्या पुत्रांनी दाखवलेले शौर्य आणि धर्माभिमान ही भारतभूमी कधीही विसरणार नाही, नाताळ हा ख्रिस्ती बांधवांचा प्रमुख सण आहे. त्यांनी तो उत्साहात साजरा करावा. याच नाताळच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ डिसेंबरला भारतमातेच्या दोन वीरपुत्रांची पुण्यतिथी असते. आपल्यापैकी किती जणांना याची माहिती आहे. लहान वयातच देश आणि धर्म यासाठी बलिदान करण्यास सिद्ध झालेल्या अशा वीरपुत्रांच्या आणि त्यांना घडवणाऱ्या पालकांच्या कथा मोबाईल गेम्स आणि इंटरनेटच्या दुनियेत हरवलेल्या आजच्या पिढीला ज्ञात असणे आवश्यक आहे. भारतभूमी ही शूरांची, वीरांची आणि क्रांतिकारकांच्या निस्सीम त्यागाची भूमी आहे. धर्मप्रती आणि देशाप्रती त्याग करण्याची भविष्यात वेळ आलीच तर या वीरपुत्रांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर राहायला हवा !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# थोडक्यात

## पारनेरला उद्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा मेळावा
### आमदार दाते यांचा सत्कार समारंभाचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने कार्यकर्त्यांचा मेळावा तसेच नवनिर्वाचीत आमदार काशिनाथ दाते यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला असल्याची माहिती तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर यांनी दिली आहे. शनिवार, दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांच्या अध्यक्षतेखाली पारनेर येथील नगर जिल्हा सहकारी बँकेच्या सभागृहात राष्ट्रवादीचा मेळावा पार पडणार आहे. यावेळी नगर जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सभापती मधुकर उचाळे, माजी नगराध्यक्ष विजय औटी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अपेक्षित असलेल्या पक्षाची ध्येय धोरणे व विचारधारा जन सामान्यांपर्यंत पोहचविणे, सभासद नोंदणी वाढवून गाव तेथे पक्षाची शाखा स्थापन करणे तसेच नवनिर्वाचीत आ.काशिनाथ दाते यांचा पक्षाच्या वतीने सन्मान करण्यात येणार आहे. तरी सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक या सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन पक्षाच्या महिला विभागाच्या अध्यक्षा सुषमा रावडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष भास्कर उचाळे यांनी केले आहे.

## महापालिका मुख्यालयात वीर बाल दिवसानिमित्त अभिवादन

**अक्षराज : जे.के.पोळ**
**दि.२७, पनवेल :**



महानगरपालिकेच्या मुख्यालयात गुरुवार, दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी 'वीर बाल दिवस' निमित्ताने गुरू गोविंदसिंगांच्या पुत्रांसहित असलेल्या प्रतिमेस आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त बाबासाहेब राजळे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहा. आयुक्त स्वरूप खारगे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, महापालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.दहावे शीख गुरू गोविंदसिंग यांचे पुत्र जोरावर सिंह व फतेसिंह यांचे वय ९ व ६ वर्ष असताना शीख संप्रदायाचा सन्मान, अस्मिता हेतू रक्षणार्थ त्यांनी हौतात्म्य पत्करले. याचीच आठवण म्हणून त्यांना अभिवादन करण्यासाठी आजचा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून साजरा केला जातो.

## ग्रामपंचायतच्या नियोजित जागेची पाहणी करण्यासाठी गटविकास अधिकारी यांची भेट
## अहिल्यानगर जिल्ह्यात दोन दिवस 'अवकाळी'चे संकट

**अक्षराज : जयराम देमगुंडे**
**दि.२७, उदगीर (लातूर) :** उदगीर गुडसूर ग्रामपंचायत क्षेत्रात नियोजित ग्रामपंचायतीसाठी निवडलेल्या जागेची पाहणी करण्यासाठी उदगीर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर व विस्ताराधिकारी आरोग्य




वाघमारे या अधिकाऱ्यांनी दौरा केला. या दौऱ्यात संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजित ग्रामपंचायतीच्या जागेची अंमलबजावणीसाठी योग्य जागेची पाहणी करून संभाव्य अडचणी व उपायांची चर्चा केली. यावेळी ग्रामपंचायत सरपंच उत्तम सूर्यवंशी उपसरपंच बालाजी देमगुंडे ग्रामविकास अधिकारी बि.के.कांबळे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विठ्ठल मरलापल्ले. रोफ थोडगे, पत्रकार नागेश नवाडे, पत्रकार जयराम देमगुंडे, चमन मिस्त्री, स्थानिक नागरिक अतिश पिंगळे, बालाजी तोटकर, मनोज हळंबे, किशन भारती व ग्रामपंचायत कर्मचारी प्रकाश कुलकर्णी, पिंटू गुणाले, सुभाष सूर्यवंशी, लक्ष्मण सूर्यवंशी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी जागेची परिस्थिती, पायाभूत सुविधा आणि भविष्यातील विकासकामांसाठी आवश्यक बाबींची तपशीलवार माहिती घेतली. तसेच, नागरिकांनी जागेच्या सद्यस्थितीतील वापर, अडचणी आणि त्यांच्या अपेक्षा अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवल्या. अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतचे काम वेळेत पूर्ण करून घेण्याच्या सूचना केल्या आहेत. ही पाहणी स्थानिक विकासासाठी महत्त्वाची ठरणार असून लवकरच या ग्रामपंचायतचे काम हाती घेण्यात येईल, अशी माहिती गुडसूर ग्रामपंचायतीने दिली आहे.

## शेतकरी चिंतेत; दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२६, अहिल्यानगर :** जिल्ह्याच्या काही भागात गुरुवारपासून (२६ डिसेंबर) ते २९ डिसेंबरपर्यंत पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. दिनांक २६ आणि २९ डिसेंबर रोजी विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस तसेच २७ आणि २८ डिसेंबर रोजी विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यापासून शेतीम ालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल आणला असेल किंवा तसे नियोजन केले असल्यास शेतीमालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. स्वत: चे व जनावरांचे संरक्षण होईल. याबाबत नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१- २३२३८४४/२३५६९४० वर संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी शाहूराज मोरे यांनी केले आहे.